# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवाये समर्पिता

## दिनांक २५ मार्च २००९ (का.प.क्र.२४) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

बुधवार दिनांक २५/०३/२००९ रोजी मा.महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी १२.२५ वा.वंदेमातरम या गिताने सुरू झाली सभेला उपआयुक्त श्री.उध्दव घुगे नगरसचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स.पालीका सदस्य उपस्थित होते.

०१. स.स.श्री.भाऊसाहेब बाबुराव वाघ
०२. स.स.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
०३. स.स.श्री.गजानन रामकिशन बारवाल
०४. स.स.श्रीमती खान मेहरून्नीसा खान हमीद
०५. स.स.श्री.बमणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सीताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
१०. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
११. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
१२. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
१३. स.स.श्री.जेम्स अंबिलढगे
१४. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१५. स.स.सौ.विजयाताई बनकर
१६. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१७. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१८. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१९. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
२०. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२१. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२२. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपत
२३. स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडूजी
२४. स.स.सौ.रगडे सुशिला भगवान
२५. स.स.श्रीमती मिराताई रामराव शिंदे
२६. स.स.श्रीमती पाटील दिपाली सुनिल
२७. स.स.श्री.मोहम्मद जावेद मोहम्मद इसाक
२८. स.स.सौ.मिटकर शोभा हरिश्चंद्र
२९. स.स.श्रीमती यास्मीन बेगम अ.कदीर
३०. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
३१. स.स.श्री.तनवाणी किशनचंद लेखराज

३२. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
३३. स.स.श्री.अब्दुल रशीद खान (मामु)
३४. स.स.श्रीमती लता श्रीनिवास दलाल
३५. स.स.श्री.संजु रिडलॉन
३६. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन
३७. स.स.श्रीमती कुरैशी नजमा बेगम युनूस
३८. स.स.श्री.खान निसार मोहमंद खान
३९. स.स.श्री.शेख इब्राहीम शेख इमाम
४०. स.स.श्री.हाजी शेर खान अ.रहेमान
४१. स.स.श्री.अशोक गोरखनाथ विरकर
४२. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४३. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४४. स.स.श्रीमती शेख शमशाद बेगम शेख हफिज
४५. स.स.श्री.संतोष सुधाकरराव जेजुरकर
४६. स.स.सौ.सरला सखाराम पोळ
४७. स.स.श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
४८. स.स.श्रीमती बोरामणीकर कला सुरेश
४९. स.स.श्री.डॉ.कराड भागवत किसनराव
५०. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५१. स.स.श्री.रेणुकादास दत्तोपंत वैद्य
५२. स.स.श्रीमती रेखा कैलास काथार
५३. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५४. स.स.श्रीमती पाटणी हर्षमाला विजयकुमार
५५. स.स.श्री.खुडे विजय किसनराव
५६. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
५७. स.स.श्रीमती जयश्री किवळेकर
५८. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
५९. स.स.श्रीमती सरिता ससाणे अशोक
६०. स.स.श्री.भगवान (बापु) देविदासराव घडमोडे
६१. स.स.श्री.रवि साहेबराव कावडे
६२. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६३. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६४. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
६५. स.स.श्रीमती वाघमारे पार्वताबाई विजय
६६. स.स.श्री.विसपुते शशांक दामोधर
६७. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
६८. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
६९. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७०. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७१. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
७२. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
७३. स.स.श्री.संजय पांडूरंग शिरसाट
७४. स.स.श्रीमती अल्पा विकास जैन

७५. स.स.श्रीमती मोमीन सफिया फिरदोस अय्युब खान
७६. स.स.श्रीमती अनिता नंदकुमार घोडेले
७७. स.स.श्री.विनोद सोनवणे

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.संजय किसनराव केनेकर
०२. स.स.श्री.किशोर तुलशीबागवाले
०३. स.स.श्री.राजेश (पप्पू)व्यास

**विषय क्र. ४९८ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० (३) अन्वये स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या आठ (०८) सदस्यांच्या जागेवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१-अ अन्वये पालिका सदस्यांतून ०८ (आठ) सदस्यांची नियूक्ती करणे.

नगरसचिव : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २० (३) स्थायी समितीच्या सदस्यांपैकी निम्मे सदस्य पूढील प्रत्येक वर्षी पोट कलम (२) मध्ये उल्लेख केलेली महापालिकेची पहिली सभा ज्या महिन्यात भरेल त्या महिन्याच्या पहील्या तारखेस दूपारी निवृत्त होतील.

२० (४) पोट कलम (२) अन्वये निवडून आल्यानंतर एक वर्षाने पोट कलम (३) अन्वये कोणते सदस्य निवृत्त होतील ते पोट कलम (३) मध्ये विनिर्दीष्ट केलेल्या त्यांच्या निवृत्तीच्या तारखेपूर्वी स्थायी समितीचा सभापती ठरविल अशावेळी व अशारितीने चिठ्ठ्या टाकून ठरविण्यांत येईल आणि त्यानंतर पुढील वर्षी स्थायी समितीचे जे सदस्य आपल्या पदावर जास्तीत जास्त काळ पर्यंत असतील ते निवृत्त होतील.

परंतू पुन्हा नेमण्यात आलेल्या सदस्यांच्या बाबतीत या पोटकलमाच्या प्रयोजनासाठी त्यांच्या पदाची मुदत त्यांच्या फेरनेमणूकीच्या तारखेपासून मोजण्यात येईल. तसेच कलम २० (५) प्रमाणे निवृत्तीच्या तारखेच्या मागील महिन्यात, जे सदस्य निवृत्त होणार असतील त्या सदस्यांच्या पदाच्या जागा भरण्यासाठी स्थायी समितीच्या नविन सदस्यांची नेमणूक केली पाहीजे अशी तरतूद आहे.

**सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २, क ६ अन्वये हे कलम दाखल करण्यात आले.**

**३१ अ. प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून समित्यावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त करणे.**

(१) कोणत्याही समितीवरील पालिका सदस्यांची नियुक्ती ही त्याने धारण केलेल्या कोणत्याही पदाच्या आधारे असेल अशी ज्याबाबतीत या अधिनियमाद्वारे तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही, पुढील समित्यांच्या बाबतीत या अधिनियमात अथवा तदन्वये केलेल्या नियमात किंवा उपविधीमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिकेद्वारे या समित्यांवर केली जाणारी पालिका सदस्याची नियूक्ती ही, पोट-कलम (२) च्या तरतूदीनुसार पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करून करण्यांत येईल मग ही नियुक्ती नियमित पदावरील असो किंवा नैमित्तिक रिक्त पदावरील असो.

(अ) स्थायी समिती
(ब) परिवहन समिती
(क) कलम ३० अन्वये नियुक्त केलेली कोणतीही विशेष समिती
(ड) कलम ३१ अन्वये नियुक्त केलेली कोणतीही तदर्थ समिती

(२) समितीवर पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करतांना, महानगरपालिका, मान्यता प्राप्त पक्षाचे अथवा नोंदणीकृत पक्षाचे किंवा गटाचे तौलणिक संख्याबळ विचारात घेईल आणि सभागृह नेता, विरोधी पक्षनेता व अशा प्रत्येक पक्षाचा किंवा गटाचा नेता यांच्याशी विचारविनिमय करून शक्यतोवर, महानगरपालिकेतील अशा पक्षाच्या किंवा गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करील.

परंतू या पोट कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीचा, तिच्यामूळे अशा कोणत्याही पक्षाच्या किंवा गटाच्या नसणाऱ्या कोणत्याही सदस्याचे समितीवर नामनिर्देशन करण्यास महापालिकेला प्रतिबंध होतो असा अर्थ लावला जाणार नाही.

परंतू आणखी असे की, महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम, १९८६ (१९८७ चा महा.२०) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये मान्यता प्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट यांचे तौलणिक संख्याबळ निश्चित करण्याच्या प्रयोजनाकरीता, निवडणूक निकालांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीच्या आत, मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट अथवा कोणत्याही पक्षाचे किंवा गटाचे नसलेले निर्वाचित पालिका सदस्य यांना एकत्र येवून आघाडी किंवा फ्रंट तयार करता येईल आणि अशा आघाडीची किंवा फ्रंटची नोंदणी झाल्यावर अशा आघाडीच्या किंवा फ्रंटच्या सदस्यांना उक्त अधिनियमाच्या तरतूदी, जणू काही ही आघाडी किंवा फ्रंट निवडणूकी पुर्वीच नोंदणीकृत असल्याप्रमाणे, लागू होतील.

(३) अशा पक्षाच्या किंवा गटाच्या वतीने नामनिर्देशीत करावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येच्या बाबतीत कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास,त्याबाबतीत, महापालिकेचा निर्णय अंतिम असेल.

अशी तरतूद आहे.

सार्वत्रिक निवडणूक २००५ नंतर औरंगाबाद महानगरपालिकेची पहिली सर्वसाधारण सभा दिनांक २९ एप्रिल २००५ रोजी संपन्न झालेली आहे.

सार्वत्रिक निवडणूक २००५ नंतर वेळोवेळी संपन्न झालेल्या पोट निवडणूका विचारात घेता औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये सद्यस्थितीत पक्ष निहाय सदस्य संख्या खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| * | शिवसेना | - | २६ |
| * | भारतीय जनता पक्ष | - | २१ |
| * | इंडियन नॅशनल कॉंग्रेस | - | २१ |
| * | नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी | - | ११ |
| * | अपक्ष | - | १४ |

**<u>इतर</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| * | आर.पी.आय. (डेमोक्रॅटीक) | - | ०१ |
| * | आर.पी.आय. (अे) | - | ०१ |
| * | बहुजन समाज पार्टी | - | ०१ |
| * | पिपल्स रिपब्लीकन पार्टी | - | ०१ |
| * | भारिप बहुजन महासंघ | - | ०२ |

अधिनियमाचे कलम २० (४) च्या तरतूदीनुसार सन २००८-२००९ मधील १६ स्थायी समिती सदस्यांमधून खालील ८ स्थायी समिती सदस्य दिनांक ०१ एप्रिल २००९ रोजी दूपारनंतर निवृत्त होत आहे.

निवृत्त होणाऱ्या आठ स्थायी समिती सदस्यांच्या रिक्त जागा भरण्यासाठी मा.महापौर यांनी निश्चित केल्याप्रमाणे आज दिनांक २५ मार्च २००९ रोजी सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यांत आले असून या सभेमध्ये अधिनियमाचे कलम ३१- अ नुसार पालिका सदस्यांमधून आठ सदस्यांची स्थायी समितीवर निवड करावयाची आहे.

सौ.लता दलाल :जे सदस्य निवडले जातात पक्षाकडून किंवा गटनेता यांचेकडून जी नावे दिली जातात त्यात किती सदस्यांमागे एक सदस्य निवडला जातो किती मतांचा कोटा ग्रहीत धरून हा सदस्य निवडला जातो अशा किती पक्षाचे व गटाचे यात नावे आहे याची माहिती व त्याप्रमाणे तशी रचना यात येते का याचीही माहिती दयावी.

श्री.रेणुकादास वैद्य :अपक्ष नगरसेवकाच्या गटाने किंवा नगरसेवकांच्या कुठल्या गटाने नियुक्त करण्यासाठी आपल्याकडे पत्र दिलेले आहे का याचाही खुलासा व्हावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :ही चौथ्यांदा निवडणूक होत आहे यापूर्वीच्या निवडणूकीत असा प्रश्न का पूढे आला नव्हता.

श्री.अ.रशिद खान :यामूळे आचारसंहितेचा भंग होतो किंवा नाही.

श्री.किशनचंद तणवाणी :आचारसंहितेचा कुठेही भंग होत नाही स.सदस्यांनी फक्त माहिती विचारलेली आहे.एक उमेदवारासाठी कितीचा कोठा असावयला पाहिजे एवढेच विचारले आहे.

सौ.लता दलाल :निवडणूक होत आहे निवडणूक प्रक्रियेच्या बाबतीत माहिती विचारणे हा आमचा हक्क आहे.यात कुठेही आचारसंहितेचा भंग होत नाही.

श्री.अ.रशिद खान :मागिल निवडणूकीच्या वेळेस असे विचारण्यात आले नव्हते. याच वेळी का असा प्रश्न केलेला आहे. हे आचारसंहितेमध्ये येते किंवा नाही याचा खुलासा दयावा.

सौ.लता दलाल :नियम बदललेले आहे शंका आली असेल तर आम्ही अशी विचारणा करू शकतो तो आमचा अधिकार आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :यापूर्वी महानगरपालिकेत असा काही गट केलेला नव्हता त्यांनी अर्ज दिला असे समजते तशी शंका आली म्हणून विचारणा केली आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :कोणत्या नियमानुसार खुलासा विचारला जातो आहे व कोणत्या नियमानुसार त्यांचा खुलासा देता येतो प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.रेणुकादास वैद्य : ज्या १३ नगरसेवकांनी अर्ज केला त्यांची नावे सुध्दा दयावी.

श्री.अ.रशिद खान :१३ स.सदस्यांनी अर्ज दिला हे सदस्यांना कसे माहित झाले आपल्याकडील माहिती सदस्यापर्यत कशी गेली.

श्री.रेणुकादास वैद्य :या सभागृहात प्रोसेस कशी होते हे आम्हाला समजले पाहिजे यासाठी विचारले आहे.

याच वेळी सभागृहात स.सभासद मोठमोठयाने बोलतात.

मा.पिठासीन अधिकारी :सर्व सदस्यांनी शांत बसावे एका वेळेस एकाच स.सदस्यांनी बोलावे.

सौ.लता दलाल :ही निवडणूक होते आहे मोकळया वातावरणात घेत आहोत. शंका आल्यास स.सदस्य प्रश्न करू शकतात. नियमाने खुलासा करावा.

श्री.सलीम खान :यापूर्वीच्या निवडणूकीत अशी विचारणा केली नव्हती याच वेळी का करण्यात येते.

श्री.अ.रशिद खान :अपक्ष नगरसेवक निवडणून आले त्यांनी सहा महिण्याच्या आत आमचा गट वेगळा आहे म्हणून आयुक्ताकडे तसे दिलेले होते का? १३ सदस्यांनी अर्ज दिला हे सदस्यांना कसे कळाले. आताच गट झाला का? यामूळे आचारसंहितेचा भंग होता का?

सौ.लता दलाल :निवडणूक होत आहे. ही प्रक्रिया होत असतांना जर आम्हाला काही शंका आली तर त्या बाबतीत माहिती विचारण्याचा आमचा अधिकार आहे.

श्री.अ.रशिद खान : चार वर्षापासून निवडणूका होत आहे काही सदस्यांना नियम माहित नाही. यापुर्वी विचारणा केली नाही या निवडणूकीतच का विचारणा होते.

श्री.रेणुकादास वैद्य : यापूर्वी परीस्थिती वेगळी होती आता वेगळी आहे.

श्री.तणवाणी किशनचंद :स.सदस्यांनी प्रश्न करून माहिती विचारलेली आहे प्रशासनाने माहिती दयावी माहिती विचारली म्हणून आचारसंहितेचा भंग होत नाही.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :निवडणूक प्रोसेस सुरू झालेली आहे माहिती विचारण्याची ही वेळ नाही.

श्री.किशनचंद तणवानी : निवडणूकीच्या संदर्भातच माहिती विचारलेली आहे यात कोटा पध्दत कशी आहे निवडणूक प्रक्रिया कशी करणार आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :यात कोटा पध्दत नसतेच संख्या बळानुसार नसते ज्यावेळेस पक्षाने किंवा गटाने रजिस्ट्रेशन नॉमिनेशन होते त्याचेकडून नावे येतात.ज्यांची ज्याची अशी नावे आली आहे ते जाहीर करावे.

श्री.रेणुकादास वैद्य : जे रजिस्टर्ड पक्षातून सदस्य बाहेर गेले असतील त्यांचे बाबतीत काय करणार आहे

मा.पिठासीन अधिकारी : नगरसचिव यांनी खुलासा करावा.

नगर सचिव : (२) समितीवर पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करतांना, महानगरपालिका, मान्यता प्राप्त पक्षाचे अथवा नोंदणीकृत पक्षाचे किंवा गटाचे तौलणिक संख्याबळ विचारात घेईल आणि सभागृह नेता, विरोधी पक्षनेता व अशा प्रत्येक पक्षाचा किंवा गटाचा नेता यांच्याशी विचारविनिमय करून शक्यतोवर, महानगरपालिकेतील अशा पक्षाच्या किंवा गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करील.

परंतू या पोट कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीचा, तिच्यामूळे अशा कोणत्याही पक्षाच्या किंवा गटाच्या नसणाऱ्या कोणत्याही सदस्याचे समितीवर नामनिर्देशन करण्यास महापालिकेला प्रतिबंध होतो असा अर्थ लावला जाणार नाही.

परंतू आणखी असे की, महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम, १९८६ (१९८७ चा महा.२०) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये मान्यता प्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट यांचे तौलणिक संख्याबळ निश्चित करण्याच्या प्रयोजनाकरीता, निवडणूक निकालांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीच्या आत, मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट अथवा कोणत्याही पक्षाचे किंवा गटाचे नसलेले निर्वाचित पालिका सदस्य यांना एकत्र येवून आघाडी किंवा फ्रंट तयार करता येईल आणि अशा आघाडीची किंवा फ्रंटची नोंदणी झाल्यावर अशा आघाडीच्या किंवा फ्रंटच्या सदस्यांना उक्त अधिनियमाच्या तरतूदी, जणू काही ही आघाडी किंवा फ्रंट निवडणूकी पुर्वीच नोंदणीकृत असल्याप्रमाणे, लागू होतील.

(३) अशा पक्षाच्या किंवा गटाच्या वतीने नामनिर्देशीत करावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येच्या बाबतीत कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास,त्याबाबतीत, महापालिकेचा निर्णय अंतिम असेल.
अशी तरतूद आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : आताच खुलासा केला की एखादा गट निवडणुकीची तारीख जाहीर झाल्या पासून एक महिण्याच्या आत म्हणजे या सदस्यांना आता काही करण्याचा अधिकार नाही असा त्याचा उल्लेख होतो काय?

श्री.संजय सिरसाट : स.सदस्यांचा एखादा गट झाला असेल तर त्यांनी एक महिण्याच्या आत त्यास मान्यता घेणे बंधनकारक आहे असे प्रशासनाने खुलासा केला आहे

श्री.रेणुकादास वैद्य : मध्यतंरी चार वार्डाच्या निवडणुका झाल्या त्या सदस्यांना त्याचा स्वतः गट करायचा असेल तर त्यासाठी काय प्रोसेस आहे. त्यांना मान्यता देवू शकतो की नाही ते निवडणूक लढवू शकता की नाही त्यांचा सुध्दा एकादा प्रतिनिधी जावू शकतो की नाही.

नगर सचिव : त्यांचे निवडणूकीच्या निकालापासून एक महिण्याच्या आत तशी नोंदणी त्यांनी विभागीय आयुक्ताकडे करायला पाहिजे.

श्री.गजानन बारवाल : जो खुलासा केला तो सदस्यांनी मान्य केलेला आहे आता पुढील प्रोसेला सुरूवात करावी.

श्री.रेणुकादास वैद्य : जे १३ सदस्यांना न्यायालयात दाद मागायची असेल तर त्यांना आपण परवानगी देणार काय?

मा.महापौर : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१- अ अन्वये महापालिकेतील मान्यता प्राप्त पक्षाचे,नोंदणीकृत पक्षाचे तौलणिक संख्याबळ विचारात घेवून सभागृह नेता विरोधी पक्ष नेता व पक्षाचे गट नेता यांचेशी विचारविनिमय करून स्थायी समिती सदस्यांसाठी खालील पालीका सदस्यांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येते.

०१. स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
०२. स.श्री.निमंगावकर प्रल्हाद गणपतराव
०३. स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
०४. स.श्री.भगवान देविदास घडमोडे
०५. स.श्री.प्रशांत सुभाष देसरडा
०६. स.श्री.कैसरखान बद्रोद्यीन खान
०७. स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
०८. स.श्रीमती खान मेहरून्नीसा

**<u>ठराव :</u>**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१- अ अन्वये महापालिकेतील मान्यता प्राप्त पक्षाचे,नोंदणीकृत पक्षाचे तौलणिक संख्याबळ विचारात घेवून सभागृह नेता विरोधी पक्ष नेता व पक्षाचे गट नेता यांचेशी विचारविनिमय करून स्थायी समिती सदस्यांसाठी खालील पालीका सदस्यांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येते.

०१. स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
०२. स.श्री.निमंगावकर प्रल्हाद गणपतराव
०३. स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
०४. स.श्री.भगवान देविदास घडमोडे
०५. स.श्री.प्रशांत सुभाष देसरडा
०६. स.श्री.कैसरखान बद्रोद्यीन खान

०७. स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
०८. स.श्रीमती खान मेहरून्नीसा

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.पिठासीन अधिकारी यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद